# प्रकरण ३ रे

# " संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन"

प्रकरण ३ रे

## ' संशाधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन'

३.१ प्रास्ताविक.

३.२ संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे स्वरुप.

३.३ संशोधन समस्येशी निगडित ग्रंथ स्वरुपातील व लेख स्वरुपातील प्रकाशित साहित्याचे समालोचन.

३.४ संशोधन समस्येंशी निगडित असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन.

२.५ समारोप.

३:१ प्रास्ताविक

यापूर्वीच्या प्रकरणामध्ये म्हणजेच प्रकरण २ मध्ये प्रत्येक गाभाभूत घटकाचा अर्थ, आशय व उद्दिष्टे त्याचप्रमाणे गाभाघटक व पाठ्यपुस्तके अभ्यासक्रमाची उद्दिष्टे याविषयी ऊहापोह करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात आपण संशोधन समस्येशी निगडित साहित्याविषयी माहिती मिळविणार आहोत. प्रस्तुत संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे संशोधकाला तुलनात्मक माहिती मिळते. त्याचप्रमाणे योग्य व उचित संशोधन पद्धती निवडता येते आणि संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित कल्पना येते.

संशोधन साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे देता येतील.

१) निवडलेल्या संशोधन समस्येसंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करुन त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळविणे.

२) निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य पध्दती, तंत्र यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

३) संशोधन विषयासंबंधी सिद्धांत व गृहितकृत्य यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना प्राप्त करुन घेणे.

४) आधारसामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे.

५) संदर्भ साहित्याचा अभ्यास करुन स्वतःचे ज्ञान वाढविणे.

## ३:२ संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे स्वरुप.

संशोधन समस्येशी निगडित साहित्य दोन प्रकारचे आहे.

१) ग्रंथस्वरुपात प्रकाशित झालेले माहितीवजा व सैध्दांतिक स्वरुपाचे साहित्य.

२) संशोधन पदवीसाठी विद्यापीठामधून सादर केले गेलेले शोध प्रबंधाच्या स्वरुपातील साहित्य.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम ग्रंथ स्वरुपात वा लेख स्वरुपात प्रकाशित झालेल्या साहित्याचे थोडक्यात समालोचन केलेले आहे.

## ३:३ संशोधन समस्येशी निगडित ग्रंथ स्वरुपातील व लेख स्वरुपातील प्रकाशित साहित्याचे समालोचन.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अनेक वैशिष्टे आहेत. या वैशिष्ट्यात अभ्यासक्रमाकरता सुचवलेले दहा गाभा घटक हे एक वैशिष्ट आहे. या गाभा घटकांवर आधारित सन १९८७ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी 'Exemplar Materials on Some Core Curricular Areas'1 ही पुस्तिका प्रसिध्द केली आहे. या पुस्तिकेमधून गाभा घटकाविषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. गाभा मूल्य संस्कारासाठी हे पुस्तक देशातील सर्व शिक्षकांना अधिक उपयुक्त ठरते.

वरील पुस्तिकेप्रमाणे महाराष्ट्रातही गाभा घटकांच्या संदर्भात शिक्षकांकरता एक पुस्तिका असावी, असा विचार पाठ्यपुस्तक मंडळात संशोधन सल्लागार परिषदेत मांडला गेला.

त्यानंतर महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -१९८६, गाभा घटक परिचय"[२] नावाची पुस्तिका प्रकाशित केली. हे पुस्तक तयार करण्यासाठी म. न. अंजीकर यांच्या अध्यक्षतेखाली कर्णधार समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तुत गाभा घटकासाठी लेखक व गटप्रमुख नेमण्यात आले होते. ही पुस्तिका महाराष्ट्रातील शिक्षकांसाठी अनमोल मार्गदर्शिका ठरते. पुनर्रचित अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे १० गाभाभूत घटक. अभ्यासक्रमातील १० गाभा घटक शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रतिबिंबित करावयाचे आहेत. प्रत्येक गाभा घटकाविषयी सविस्तर व स्पष्ट माहिती मिळते त्याचबरोबर कोणते उपक्रम आयोजित करता येतील याविषयी माहिती मिळते. या दृष्टीकोनातून ही पुस्तिका शिक्षकांसाठी अनमोल मार्गदर्शक ठरते.

" प्राथमिक"

"प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम -१९८८" इयत्ता १ ली ते ५ वी [३] या पुस्तिकेच्या प्रस्ताविक लेखामधून १० गाभाघटकांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या पुस्तकामध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम व गाभा घटक यांच्यातील घनिष्ट संबंध स्पष्ट झालेला आढळतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात एक किमान

राष्ट्रीय अभ्यासक्रम सूचित करण्यात आला. या राष्ट्रीय अभ्यासक्रमातून एका विशिष्ट स्तरावरील भारतातील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्यातील जाती, लिंग, स्थान यातील भेद लक्षात न घेता समान शैक्षणिक संधी उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा आहे. प्रत्येक राज्यातील त्यांच्या सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक गरजानुसार राष्ट्रीय अभ्यासक्रमात लवचिकता आणण्यास वाव दिलेला आहे. या दृष्टिकोनातूनच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात १० गाभा घटक सामाविष्ट करण्यात आलेले आहेत, आणि हे गाभा घटक अभ्यासक्रमातही प्रतिबिंबित होतात.

'मूल्यशिक्षण' शिक्षक हस्तपुस्तिका इयत्ता नववी व दहावी [४] हे पुस्तक राष्ट्रभक्ती, सर्वधर्मसहिष्णुता, राष्ट्रीय एकात्मता, स्त्री-पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टीकोन या गाभाघटक शिक्षणासंदर्भात एक महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. या गाभामूल्यांचे स्वरुप, महत्त्व व विविध विषयातील घटकनिहाय विश्लेषण समजून घेण्यासाठी ही 'शिक्षक हस्तपुस्तिका' शिक्षकांना खूपच उपयुक्त ठरते.

श्री. ल. नी. छापेकर यांचे 'असे होतात संस्कार' [५] हे पुस्तक संस्कार कसे होतात याविषयी आहे. तथापि गाभामूल्य शिक्षणासंदर्भात देखील १० गाभा घटक ही मूल्येच असल्यामुळे आणि ती संक्रमित करायची असल्यामुळे प्रस्तुत पुस्तक उपयुक्त आहे. मूल्यसंक्रमण करीत असताना विद्यार्थ्यांच्या बाबतीत शिक्षकांची जागरुकता आवश्यक असते. प्रत्यक्ष कृतीतून आलेले अनुभव या ठिकाणी नोंद झाले असल्याने गाभा घटकांच्या शिक्षणासाठी हे पुस्तक मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी या सर्वांना उपयुक्त आहे.

प्रा. दि. ह. सहस्त्रबुध्दे यांचा 'शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन' [६] हा ग्रंथही गाभा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण असा ग्रंथ आहे. समाजजीवनातील दोषांचे विश्लेषण करुन नैतिक शिक्षणाद्वारे समाज दोषमुक्त कसा करता येईल याचा वेध त्यांनी या ग्रंथामध्ये घेतलेला आहे. त्यासाठी शिक्षकांची कोणती भूमिका असावी, दैनंदिन परिपाठामधून गाभा मूल्यसंवर्धन कसे करता येईल, शाळेमध्ये वेगवेगळे कोणकोणते उपक्रम आयोजित करता येतील, मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन कसे करावे, या संदर्भात मार्गदर्शन त्यांनी केले आहे.

श्री. नाडकर्णी यांचे 'शिक्षणाच्या वास्तव दिशा' [७] हे पुस्तक देखील महाविद्यालयातील मूल्यशिक्षण संदर्भातील उपक्रमांचे आयोजन कसे करावे, याविषयीचे अनुभव कथन आहे. लेखकाने आपल्या महाविद्यालयात उपक्रमामधून राखलेले सातत्य आणि त्यामागील त्यांची निष्ठा अनुकरणशील आहे.

प्रा. रा. तु. भगत यांनी संपादित केलेले 'आजच्या शिक्षणातील विचार प्रवाह' [८] हे पुस्तक देखील मान्यवरांचे गाभामूल्य शिक्षणविषयक विचार जाणून घेण्यास उपयुक्त आहे.

'शिक्षण : स्वभाव सुधारण्याचे ज्ञान' या डॉ. ग. श्री. खेर यांच्या लेखातून व्यक्तिच्या वाणीतून आणि कृतीतून सदाचार व्यक्त व्हावा आणि व्यक्ती सदाचारी बनून तिचे आणि पर्यायाने संपूर्ण समाजाचे जीवन मंगलमय व्हावे या संदर्भातील विचार त्यांनी मांडलेले आहेत. 'नैतिक शिक्षण' हा गो. ले. माणगांवकर यांचा लेखही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असताना योग्य त्या अभिवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये कशा जोपासाव्यात या संदर्भात

मार्गदर्शन करणारा आहे. डॉ. रा. भा. देवस्थळी यांचा 'विद्यार्थी मित्रांनो' [९] हा ग्रंथ त्यांनी शिक्षणशास्त्र विषयातील विविध विषयांवर दिलेल्या भाषणांचे संकलन आहे. या ग्रंथातील मूल्यांचे मानवी जीवनातील स्थान हे भाषण 'मूल्यांचे मानवी जीवनातील महत्त्व व आवश्यकता' लक्षात आणून देते. या लेखाच्या अनुषंगाने दहा गाभाभूत घटकांचे मानवी जीवनातील स्थान कोणते ते समजून येण्यास मदत होते.

श्री. महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या प्राचार्यांनी संपादित करुन प्रकाशित केलेल्या 'मूल्यशिक्षण' [१०] विशेषांकही प्रत्यक्षपणे मूल्यशिक्षणासंदर्भात आणि अप्रत्यक्षपणे १० गाभा घटकांच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. पाठ्यपुस्तकातील गाभा मूल्यांचा शोध घेऊन ती विद्यार्थ्यांमध्ये कशी बिंबवावीत यासाठी तयार केलेले सरावपाठ या विशेषांकामध्ये समाविष्ट आहेत. मूल्यशिक्षणाच्या दृष्टिकोनातून पाठ नियोजन कसे करावे या बाबतही मार्गदर्शन या विशेषांकामध्ये केलेले आहे.

विविध शिक्षण आयोग आणि शिक्षण मंडळे यांच्या नैतिक शिक्षणाच्या संदर्भातील शिफारशींचा आढावा घेऊन एन्.सी.ई.आर्.टी. नवी दिल्ली, ने "Documents on Social, Moral and spiritual values in education [1979]" [११] या पुस्तिकेमध्ये मूल्यांची यादी दिलेली आहे. गाभामूल्य स्वरुप समजून घेण्यासाठी व संक्रमणासाठी ती अवलोकनेही महत्त्वाचे आहे.

या सर्व ग्रंथाचे व गाभा मूल्यसंदर्भात प्रकाशित झालेल्या लेखांचे समालोचन केले असता एक गोष्ट लक्षात येते की प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित झालेल्या गाभा मूल्यांचे विद्यार्थ्यांमध्ये संक्रमण कसे करायचे त्यासाठी पूर्वनियोजन कसे असले पाहिजे, गाभा मूल्यांच्या संक्रमणामध्ये येणाऱ्या अडचणी कोणत्या या संदर्भात अद्यापि संशोधन झालेले नाही. सबब प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला हा विषय मूलगामी व नवीन असा आहे.

## ३:४ संशोधन समस्येशी निगडित असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन.

वरील परिच्छेदांतून ग्रंथरुपाने अथवा लेखरुपाने प्रकाशित झालेल्या साहित्याचे समालोचन केले. पुढील परिच्छेदांतून संशोधन समस्येशी संबंधित असलेल्या साहित्याचे समालोचन केले आहे.

प्रस्तुत विषयांशी संबंधित संशोधनात्मक साहित्याचा शोध घेण्यासाठी संशोधिकेने पुढील ग्रंथांचे अवलोकन केलेले आहे.

१) दि थर्ड इंडियन इयर बुक ऑफ एज्युकेशन रिसर्च, एन्.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली, १९६९.

२) दि. सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, संपादक -एम्. बी. बुच सेंटर ऑफ ॲडव्हान्स स्टडी इन एज्युकेशन, दि एम्. एस्. युनिव्हर्सिटी, बडोदा १९८४.

३) एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन इंडियन युनिव्हर्सिटीज (१९३९-१९६१) एन्.सी.ई.आर.टी. न्यू दिल्ली, १९६३

४) एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन युनव्हर्सिटीज इन महाराष्ट्र (१९३९-१९७०) स्टेट इन्स्टीट्यूट ऑफ, पुणे, ३०.

५) दि सेकंड ऑफ रिसर्च इन एज्युकेशन (१९७२-१९७८) संपादक डॉ. एम्. बी. ब्रुच, सोसायटी ऑफ एज्युकेशन रिसर्च अँड डेव्हलपमेंट, बडोदा १९७८.

६) एज्युकेशन रिसर्च इन दी युनिव्हर्सिटीज ऑफ बॉंबे संपादिका डॉ. (सौ.) प्रतिभा देव डिपार्टमेट ऑफ एज्युकेशन. युनिव्हर्सिटी ऑफ बॉंबे, १९८१.

७) भाषा व साहित्य : संशोधन (आवृत्ती १९८१) संपादक डॉ. वसंत स. जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, ३०

८) एज्युकेशन रिसर्च इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र प्लॅटिनम ज्युबिली इय व्हॅल्यूम. संपादक डॉ. एन. के. पाटोळे, एस.टी. कॉलेज, मुंबई-१९८३.

९) थर्ड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन (१९७८-१९८३) संपादक डॉ. एम्. बी. बुच, नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च अँड ट्रेनिंग १९८६.

१०) ॲबस्ट्रॅक्टस ऑफ डॉक्टरल रिसर्च इन एज्युकेशन, संपादकः डॉ एस. बी. पांडे, डॉ एम. बी. कुंडले. (नागपूर - सेक्रेटरी शिक्षण समीक्षा मंडळ, १९८७)

वरील ग्रंथाव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, यांच्यावतीने प्रसिद्ध होणारे रिसर्च बुलेटिन, या त्रैमासिकाचे सर्व अंक त्याचप्रमाणे असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी न्यूज, या सामाहिकातील "थिसीस ऑफ दि ग्रंथ" सदराखाली प्रसिध्द होणाऱ्या विद्यापीठानी स्वीकृत केलेल्या प्रबंधांची नावे चाळली.

वरील ग्रंथाचे काळजीपूर्वक अवलोकन करुन प्रस्तुत संशोधनाशी संबंधित जे संशोधन झालेले आहे त्याचा आढावा पुढील परिच्छेदातून घेतलेला आहे.

Ehsanul Heg (१९७३) [१२] यांनी भारतीय राज्य घटनेत नोंद झालेली आधुनिक राजकीय मूल्ये आणि शाळेतील क्रमिक पुस्तकातील पाठ्यशाळामधून बिंबविण्याची मूल्ये यांच्या संबंधात अभ्यास केलेला आहे. यासाठी त्यांनी दिल्लीतील शाळांमधील विशेषतः हिंदी, इंग्लीश, इतिहास, नागरिकशास्त्र या क्रमिक पुस्तकांच्या पाठ्यशाळांचे वर्गीकरण विश्लेषण केलेले आहे. त्यांना मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे.

क्रमिक पुस्तकातील मूल्यांचे सादरीकरणामध्ये विशिष्ट असा साचा (पॅटर्न) किंवा सातत्य राखले गेलेले नाही.

मूल्यांचे स्वरुप आणि विद्यार्थ्यांची मानसिक क्षमता यांच्या मधील संबंध योग्य नाहीत.

विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये समान वयोगटाच्या व मानसिक पातळीच्या बाबतीत सारखेपणा राखला गेलेला नाही.

प्राथमिक स्तरावरील भाषेची पुस्तके काही अंशी मूल्ये संक्रमित करण्यास उपयुक्त ठरतील. असे वाटते पण ९ वी, १० वी व ११ वीची क्रमिक पुस्तके पूर्णांशाने वाङमयीन दृष्टिकोनातून लिहिली गेलेली आहेत. ज्या पुस्तकातून राजकीय मूल्ये संक्रमित करावयाची अशी आपण अपेक्षा करतो त्या नागरिकशास्त्राच्या पुस्तकातूनही मूल्यासंदर्भात जाणीवपूर्वक व सातत्यपूर्ण प्रयत्न केले गेलेले नाहीत.

मानसिक क्षमतेच्या तत्त्वानुसार १ ली ते ११ वी च्या निरनिराळ्या क्रमिक पुस्तकातून निरनिराळ्या राजकीय मूल्यांवर अधिक भर दिला गेलेला नाही.

शिक्षणाच्या समाजशास्त्राचा क्षेत्रिय अभ्यास करीत असताना श्री. गोरे यांनी (१९७०) [१३] जे संशोधन केले त्याचे पुढील प्रमाणे निष्कर्ष आहेत.

राष्ट्रीय संस्कृतीची प्रतिके म्हणून आपण क्रमिक पुस्तकाकडे पाहू शकतो. इतर कोणत्याही साधनापेक्षा राष्ट्रीय उद्दीष्टे व मूल्ये रूजविण्यासाठी क्रमिक पुस्तके ही महत्त्वाची साधने आहेत. भारतातील सामाजिक तत्त्वप्रणालीमध्ये जर उदारमतवादी लोकशाही व शास्त्रीय तंत्रज्ञान ही जर मूल्यांची महत्त्वाची उगमस्त्रोत्रे गृहीत धरली तर शिक्षण पद्धतीनेही आपल्या कृतितून आणि पद्धतितून त्यांचा वापर केला पाहिजे. जर आपल्या कृतिमधून आणि पद्धतीतून इहवादी आणि बुध्दिनिष्ठ लोकशाही समाज अपेक्षित असेल तर बुध्दिनिष्ठ इहवाद व समता यांना शिक्षण प्रक्रियेत योग्य स्थान मिळाले पाहिजे. त्यांना क्रमिक पुस्तकातून व अवांतर वाचनासाठी असलेल्या पुस्तकातून योग्य स्थान दिले गेले पाहिजे. Keasey ने (१९७१) [१४] असा निष्कर्ष काढला की, सामाजिक कार्यामधील सहभाग हा व्यक्तीच्या नैतिक विकासाचा परीपाक आहे. जितका नैतिक विकास अधिक असेल तर तितक्याच अधिक प्रमाणात त्या व्यक्तीचा सामाजिक कार्यामध्ये अधिक सहभाग असेल.

प्रा. यु. एस. चौधरी व प्रा. बी. ए. शर्मा यांनी इंदोर विद्यापीठामध्ये (१९७४) शोधप्रबंध सादर केला. त्यांनी एन.सी.इ.आर.टी. दिल्ली. ने तयार केलेली राष्ट्रीय पातळीवरील इयत्ता १ ते ८ ची हिंदी विषयाची क्रमिक पुस्तके व मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाने तयार केलेली १

ली ते ८ वी ची हिंदी पुस्तके याचा या पुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. हे संशोधन त्यांनी एम.एड. पदवीसाठी सादर केले[१५]. संशोधनातून त्यांना मिळालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

एन.सी.ई.आर.टी. च्या क्रमिक पुस्तकातून 'शौर्य' आणि 'साहस' या मूल्यांवर अधिक भर दिलेला आहे.

मध्यप्रदेश क्रमिकपुस्तक मंडळाच्या क्रमिक पुस्तकामध्ये 'देशप्रेम' या मूल्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे.

एन.सी.ई.आर. टी. व मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळ यांच्या क्रमिक पुस्तकामधून मूल्यांच्या सादरीकरणामध्ये बरेच साम्य असले तरी एन.सी.ई.आर. टी. च्या क्रमिक पुस्तकामधून त्याग, परमेश्वरावरील श्रध्दा, आज्ञाधारकपणा या मूल्यांवर कमी भर दिलेला दिसतो तर मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाच्या पुस्तकामध्ये सहकार्य व Compassion àb मूल्यावर कमी भर दिलेला आढळून येतो.

मध्यप्रदेशाच्या राष्ट्रीय (Nationalized) इयत्ता १ ली ते ८ वी च्या हिंदी क्रमिक पुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टीकोनातून मूल्यमापन प्रा. यु. एस. चौधरी यांनी केलेले आहे. हे संशोधन त्यांनी इंदोर विद्यापीठामध्ये 'वाचस्पती' (पी.एच.डी.) साठी १९७५ [१६] मध्ये सादर केले. सदर संशोधनातून पुढीलप्रमाणे निष्कर्ष मिळालेले आहेत.

'देशभक्ती' या मूल्याला क्रमिक पुस्तकामध्ये अधिक महत्त्व दिलेले असून 'शास्त्रीय दृष्टिकोनाला' अल्पमहत्त्व दिलेले आहे.

Industry (उद्यम) Compassion (भरपाई) धैर्य आणि प्रेम या मूल्यांना इयत्ता १ली ते ४ थी च्या क्रमिकपुस्तकांतून जास्त महत्त्व दिलेले असून ५ वी ते ८ वी च्या क्रमिक पुस्तकातून प्रेम, Compassion धैर्य आणि समानता यांना अधिक महत्त्व दिलेले आहे.

इयत्ता १ली ते ४ थी च्या क्रमिक पुस्तकातून समानता, सत्य humbleness, अहिंसा, त्याग आणि स्वातंत्र्य यांना सारखे महत्त्व दिलेले आहे. तर ५ वी ते ८ वी च्या क्रमिक पुस्तकांतून सहकार्य humbleness त्याग, निधर्मिपणा, आंतरराष्ट्रीय सामंजस्य यांना सर्वसाधारण सारखे महत्त्व दिलेले आहे.

इयत्ता १ ली ते ५ वी च्या क्रमिक पुस्तकातून आरोग्य, शास्त्रीय दृष्टीकोन, निधर्मिपणा, न्याय, आंतरराष्ट्रीय सामंजस्य यांना अल्पमहत्त्व दिलेले आहे.

५ वी ते ८ वी च्या क्रमिक पुस्तकातून शास्त्रीय दृष्टिकोन, निधर्मिपणा, न्याय, साधी राहणी, अहिंसा, कर्तव्यजाणीव यांना अल्प महत्त्व दिलेले आहे.

पाठ्यपुस्तकातील मूल्यांच्या सादरीकरणामध्ये विशिष्ट असा साचा किंवा सातत्य नाही.

Yeager (१२७९), यांनी आपल्या संशोधनात कोहलबर्गच्या सिद्धांताचा उपयोग केला. यामध्ये वर्गाध्यापनाच्या पद्धती व त्याविषयींच्या आडाख्यांचा प्रामुख्याने समावेश आहे.[१७]

Rise (१९८१) यांनी विशिष्ट शैक्षणिक अभ्यासक्रमाचा नैतिक विकास साधण्याच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल. या उद्देशाने संशोधन केले आहे. [१८]

Carrod (१९८२) यांनी केलेल्या संशोधनामध्ये उच्चमाध्यमिक पातळीवरील इंग्रजीचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमधील नैतिक विकास घडवून आणण्यास कितपत सहाय्यभूत होईल याचा उहापोह केलेला आहे.

Bailey (१९८५) यांनी प्राथमिक शिक्षकांची वर्गाध्यापनाच्या वेळेची सहनशिलता (विशेषतः गैरवर्तणूक करणाऱ्या मुलांना अध्यापन करताना) आणि अशा विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासासंबंधी संबंधित शिक्षकांचे अंदाज याचा विचार केलेला आहे.[२०] याबाबत त्यांनी असा निष्कर्ष काढला की, सहनशिलतेची पातळी आणि स्वरुप हे त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासाच्या पातळीवर अवलंबून असते.

प्रा. एम. एन. सावंत श्रीरामपूर यांनी एम्.फिल. पदवीसाठी शोधप्रबंध सादर केला त्यामध्ये त्यांनी इयत्ता १ ली ते ४ थी च्या भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकांत प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा चिकित्सक अभ्यास केला व या वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत या संबंधी शिफारशी केलेल्या आहेत.

## प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे :

१) इयत्ता १ ते ४ च्या भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि या पाठ्यपुस्तकांत प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा शोध घेणे.

२) इयत्ता १ ली ते ४ थी या वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत या बाबत संबंधित वर्गांना शिकविणाऱ्या अध्यापकांच्या मतांचा शोध घेणे.

३) इयत्ता १ ली ते ४ थी मधील वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत या संबंधी शिफारशी करणे.

## कार्यपध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करुन संबंधित संशोधनाची साधनसामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखती या साधनांचा अवलंब केला आहे.

## प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष :

१) प्रस्तुत पाठ्यपुस्तकात विविध पाठातील विषयात संस्काराच्या दृष्टीने विविधता आढळते.

२) धर्माचा व मूल्यांचा निकटचा संबंध आढळून येतो.

३) पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश राष्ट्रीय व भावनात्मक ऐक्याला बाधक ठरणार नाही.

४) मूल्ये परिणामकारक बिंबवण्यासाठी अभ्यासक्रमात बदल करण्याची आवश्यकता वाटते.

५) इयत्ता १ ली ते ४थी च्या भाषा विषयाच्या पाठ्यपुस्तकाद्वारे सत्य, समता, बंधुभाव, सहकार्य, एकता, प्रेमभाव ऐक्य आदी चिरंतन मूल्ये बिंबवण्याचा प्रयत्न झालेला आहे.

६) इयत्ता ४ थी च्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून स्फूर्ती व प्रेरणा मिळतेच त्याशिवाय शिवरायाची मातृभक्ती, पितृभक्ती, राष्ट्रभक्ती, मित्रप्रेम व धर्मनिष्ठा इत्यादी मूल्ये बिंबवण्याचा प्रयत्न चांगला केलेला आहे.

७) प्रस्तुत पाठ्यपुस्तके अहिंसावादी दृष्टीकोन निर्माण करत नाहीत व भ्रष्टाचाराचा उच्छेद करण्यासाठी झुंजण्याची प्रेरणा देत नाहीत.

८) प्रत्यक्ष कृती किंवा वर्तन केल्याशिवाय मनावर मूल्ये बिंबवली जावू शकत नाहीत. इतिहास, भूगोल या पाठ्यपुस्तकात प्रत्यक्ष कृती करण्यास फारशी संधी उपलब्ध झालेली दिसत नाही.

९) भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकात लोकशाही एक जीवनपद्धती ही वृत्ती वृध्दिंगत होईल अशी संधी प्राप्त झालेली नाही.

१०) श्रमसंस्कार रुजविण्यासाठी श्रमनिष्ठा व श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये वृध्दिंगत होण्यासाठी काही सुधारणा होणे गरजेचे आहे.

प्रा. के. एन. सांगळे यांनी प्राथमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्य शिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास[२२] या विषयावर शिवाजी विद्यापीठास शिक्षणक्षेत्रातील एम.फिल. पदवी साठी प्रबंध सादर केला.

सदर संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१) इयत्ता १ली ते ४ थी च्या स्तरावरील मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून व्यक्त होणाऱ्या मूल्यांचा शोध घेणे.

२) ही मूल्ये रुजविण्यासाठी संबंधित शिक्षक कोणते प्रयत्न करतात याचा अभ्यास करणे.

३) ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होत नसतील तर त्यामागील कारणांचा शोध घेणे.

४) ही मूल्ये अधिक चांगल्याप्रकारे संक्रमित होण्यासाठी कोणती उपाययोजना आणि शैक्षणिक उपक्रम हाती घ्यावयास पाहिजेत या विषयी उपाययोजना सुचवणे.

कार्यपध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करुन संबंधित संशोधनाची साधनसामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखती या साधनांचा अवलंब केला

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष :

१) मूल्य शिक्षणासाठी दृक-श्राव्य साधनांचा उपयोग केला जावा.

२) प्रगती पत्रकात मूल्ये किती प्रमाणात रुजली ? याचा विधानात्मक स्वरुपात उल्लेख करण्यात यावा.

३) पाल्याच्या वर्तनात इष्ट परिवर्तन व्हावे म्हणून कशाप्रकारची उपाययोजना

करावी ? या बाबत पालकांना मार्गदर्शन करावे.

प्रा. एम. बी. वेदांते यांनी माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास [२३] या विषयावर शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्रातील एम. फिल. पदवीसाठी प्रबंध सादर केला होता. सदर संशोधकाने काढलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

मूल्यसंक्रमण ही व्यक्तिमत्त्वाच्या विकासासंबंधीची बाब असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित असलेल्या घटकामध्ये पालक, मुख्याध्यापक, शिक्षक, शासन, समाजातील मान्यवर यांच्यामध्ये मूल्य शिक्षणाच्या संदर्भात वैचारिक कृतिशील सहकार्य असायला पाहिजे.

प्रा. डॉ. सुदेश करंदीकर यांनी इयत्ता ५ वी ते १० वी च्या मराठीच्या प्रचलित पाठ्यपुस्तकात मातृभाषेच्या अध्यापनाची मूल्यात्मक उद्दिष्टे किती प्रमाणात प्रतिबिंबित झाली आहेत व व्हावीत यांचा चिकित्सक अभ्यास[२४] या विषयावर पुणे विद्यापीठास शिक्षणशास्त्रातील पी.एच.डी. पदवीसाठी शोध प्रबंध सादर केला आहे.

सदर संशोधकांनी काढलेले निष्कर्ष व शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१) या प्रकारच्या पाठांचे प्रमाण अत्यल्प म्हणजे शेकडा ६ % इतके आहे.

२) वाङमय प्रकारच्या बाबतीतच हे मूल्य निबंध या वाङमय प्रकारातून प्रामुख्याने प्रतिबिंबित झालेले आहे.

३) इयत्ता ८ वी च्या पाठ्यपुस्तकात ते सर्वात जास्त म्हणजे शेकडा ८% आढळते.

४) चरित्र विचारधन या आशयाच्या पाठामधूनही विज्ञाननिष्ठा पाठ्यपुस्तकात समाविष्ठा झालेली दिसून येते.

प्रा. सौ. वर्षा ससे यांनी उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यपनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास[२५] या विषयावर शिवाजी विद्यापीठास सदर संशोधिकेने काढलेले निष्कर्ष व शिफारशी पुढील प्रमाणे आहेत-

१) मूल्य शिक्षणासाठी वेळापत्रकात स्वतंत्र तास व शिक्षक असावेत.

२) मूल्य शिक्षणातील कार्यक्रम धार्मिक शिक्षणापासून अलिप्त ठेवावेत.

३) अध्यापकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाप्रमाणेच सेवापूर्व प्रशिक्षणातही मूल्याधिष्ठित अध्यापना विषयी प्रशिक्षण होणे आवश्यक आहे.

४) मूल्यांचे यशस्वीपणे संक्रमण होण्यासाठी अध्यापक स्वतः मूल्ये जपणारा असावा.

## ३:५ समारोप :

प्रास्ताविकात म्हंटल्याप्रमाणे संशोधनाशी संबंधित साहित्याचा हा आढावा संशोधिकेला उपयुक्त व मार्गदर्शक ठरला हा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर आणखी एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की अद्यापि प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या गाभा घटकांच्या संदर्भात स्वतंत्रपणे संशोधन झालेले नाही. म्हणूनच प्रस्तुत संशोधन हे मूलगामी आणि नवीन ठरते.